CNR. No. MHBU040001112018.

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल दिनांक | | ३०/०१/२०१८ | |
| नोंदणी दिनांक | | ३०/०१/२०१८ | |
| निकाल दिनांक | | ३०/०७/२०२६ | |
| कालावधी | **०८ व** | **०६ म** | **०० दि** |

**निशाणी क्रमांक– ४९.**

**नमुना क्र. XXXII**

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(i)]**

| | |
|---|---|
| **विशेष न्यायाधीश, खामगांव, जिल्हा बुलढाणा येथील न्यायालयात**<br>**पीठासीन अधिकारी :– अमित प्र. कोकरे, विशेष न्यायाधीश** | |
| | न्यायनिर्णयाची तारीख :– ३०/०७/२०२६.<br>**विशेष खटला क्र. ०६/२०१८** |
| | प्रथम खबर/गुन्हा क्र. २४७/२०१७<br>शिवाजी नगर पोलीस स्टेशन. |
| फिर्यादी/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र सरकार तर्फे शिवाजी नगर पोलीस स्टेशन,**<br>तालुका खामगाव, जिल्हा बुलढाणा. |

| | |
|---|---|
| प्रतिनिधीत्व करणार | विद्वान सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.ए.आळशी |
| आरोपी | **सुशिल सुरेश सुरवाडे**<br>वय – ३५ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>राहणार – बोरीअडगाव,<br>ता. खामगाव, जि. बुलढाणा. |
| प्रतिनिधीत्व करणार | आरोपीकरीता विद्वान विधीज्ञ श्री. ए.एस.भोजने. |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(ii )]**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १२/१०/२०१७ |
| प्रथम खबर तारीख | १२/१०/२०१७ |
| आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | ३०/०१/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ०३/१२/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०५/०७/२०२५ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखून ठेवला आहे, ती तारीख | १५/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ३०/०७/२०२६. |
| शिक्षा दिली असल्यास शिक्षेची तारीख | लागू नाही |

**आरोपीची माहिती :**

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष ठरविले की दोषी ठरविले | ठोठावलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुशिल सुरेश सुरवाडे | १२/१०/२०१७ | ३०/१०/२०१७ | भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३५४-ड, बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम १२ अन्वये | निर्दोष | लागु नाही | लागु नाही |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(iii)]**

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | पिडीता (नि. क्र. १३) | फिर्यादी |
| सा.क्र. २ | पिडीतेचे वडील (नि. क्र. १७) | साक्षीदार |
| सा.क्र. ३ | पिडीतेची आई (नि. क्र. १९) | साक्षीदार |
| सा.क्र. ४ | रणजित निळकंठराव देशमुख (नि. क्र.२१) | पंच साक्षीदार |
| सा.क्र. ५ | पिडीतेचे मावसा (नि. क्र. २७) | साक्षीदार |
| सा.क्र. ६ | सचिन चंद्रकांत यादव (नि.क्र. ३७) | पोलीस तपास अधिकारी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| | **कोणी नाही.** | **--** |

## क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास :

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | **कोणी नाही.** | -- |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाची निशाणी क्रमांकाची यादी**

## अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. १४ | तोंडी रिपोर्ट, दि. १२/१०/२०१७ |
| २. | निशाणी क्र. १५ | छापील प्रथम खबर, दि. १२/१०/२०१७ |
| ३. | निशाणी क्र. १६ | पिडीतेचा कलम १६४ फौ.प्र.सं. अन्वये नोंदविलेला जबाब |
| ४. | निशाणी क्र. २२ | घटनास्थळ पंचनामा |
| ५. | निशाणी क्र. २३ व २४ | जप्ती पंचनामे |
| ६. | निशाणी क्र. ३८ | पिडीतेचा कलम १६४ फौ.प्र.सं. अन्वये जबाब नोंदवण्याकरीता पाठवलेले पत्र |
| ७. | निशाणी क्र. ३९ | मुद्देमाल पावती |
| ८. | निशाणी क्र. ४० | पिडीतेचे शाळा सोडण्याचा दाखला |

| | | |
|---|---|---|
| ९. | निशाणी क्र. ४१ | पिडीतेचे जन्म प्रमाणपत्र |
| १० | निशाणी क्र. ४२ | सा.क्र. ५ संतोष जुनधडे यांच्या जबाबातील अधोरेकित भाग अ |
| ११. | निशाणी क्र. ४३ | मुद्देमाल पावती |
| १२ | निशाणी क्र. ४४ | अटक पंचनामा |

**ब. बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | —— | |

**क. न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | —— | |

**ड. भौतिक वस्तू (Material Objects) :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | —— | |

## न्यायनिर्णय

**(दिनांक — ३० जुलै, २०२६ रोजी पारित)**

आरोपी हा भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३५४–ड व बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १२ नुसार शिक्षा पात्र गुन्ह्याच्या संपरिक्षेचा सामना करीत आहे.

**२.** बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ३३ (७) अन्वये पिडीतेची ओळख उघड होवु नये म्हणुन तीचे व तीच्या नातेवाईकांचे नाव नमुद करण्यात आले नाही.

**३.** या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, पिडीता फिर्यादी ही १४ वर्षाची असुन ९ वी मध्ये शिकते. ती तीचे घरुन शाळेमध्ये बसने जाते. त्याकरीता ती पवन हॉटेल जवळील बस स्टॉप वरुन जाणे-येणे करते.

**४.** दि. ११/१०/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता पिडीता नेहमीप्रमाणे शाळेत जाण्याकरीता पवन हॉटेल जवळील बस स्टॉपजवळ बसची वाट पाहत थांबलेली असतांना आरोपी वय अंदाजे २५ वर्षे हा आला व त्याने काहीतरी बोलण्याचा प्रयत्न केला. परंतु पिडीतेने लक्ष दिले नाही. बस आल्यामुळे पिडीता बस मधुन शाळेमध्ये निघुन गेली.

**५.** दुसऱ्या दिवशी दि. १२/१०/२०१७ रोजी शाळेत जाण्याकरीता सकाळी १०.०० वाजता पिडीता पवन हॉटेल जवळील बस स्टॉपवर थांबलेली असतांना आरोपी हा तीच्याजवळ आला व त्याने एका कागदावर त्याचा मोबाईल नंबर व नाव लिहलेली चिठ्ठी तसेच एक तांब्याचे धातुची अंगठी पिडीतेच्या हातात दिली. त्यावेळेस आरोपी पिडीतेला म्हणाला की, 'ही अंगठी घे व उद्या मला ही

अंगठी तुझ्या हातातील बोटात दिसली पाहिजे, मी दिलेल्या नंबरवर मला फोन कर, माझे नाव सुशिल सुरवाडे आहे'. त्यामुळे पिडीतेला भिती वाटल्याने तीने पवन हॉटेलजवळ बसलेल्या एका आजोबांच्या मोबाईलवरुन तीच्या वडीलांचे मोबाईलवर फोन केला व घटनेबाबत सांगितले.

६. त्यानंतर पिडीतेचे वडील लगेच मोटरसायकलवर पिडीतेजवळ आले. पिडीतेने त्यांना घटना सांगितली.

७. त्यानंतर, पिडीतेने आरोपी हा पवन हॉटेल मध्ये काम करतो व त्याने वाईट उद्देशाने दोन दिवसापासुन तीचा पाठलाग करुन संपर्क केला आहे, या कारणावरुन आरोपीविरुध्द वडीलांसह पोलीस स्टेशनला येवुन रिपोर्ट (नि.क्र. १४) दिला.

८. त्या अनुषंगाने दि. १२/१०/२०१७ रोजी १३.४५ वाजता गुन्हा रजिस्टर क्र. २४७/२०१७ भादंवि चे कलम ३५४–ड व बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सचिन चंद्रकांत यादव यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जाऊन घटनास्थळाचा पंचनामा व जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर पिडीतेचा व इतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले व

आरोपीविरुध्द उपरोक्त अपराधा संदर्भात विशेष न्यायालय, खामगाव यांच्या समोर दोषारोपपत्र दाखल केले.

**९.** या न्यायालयाचे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपी विरुध्द भादंवि चे कलम ३५४-ड व बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम १२ नुसार खालील अपराध केला, असा दोषारोप निशाणी क्र. ०५ निश्चित केला. आरोपीने सदर अपराध कबूल नाही असे निवेदन निशाणी क्र. ०६ द्वारे दिले.

**१०.** आरोपीविरुध्दचा गुन्हा सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने एकूण सहा साक्षीदार तपासले आहेत. त्यानंतर अभियोग पक्षाने पुरसीस (निशाणी क्र. ४५) दाखल करुन अभियोग पक्षाचा पुरावा संपल्याचे कळविले आहे.

**११.** खटल्यातील तथ्य पाहता, माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणांच्या आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि. १२/१०/२०१७ रोजी सकाळी १०.०० च्या दरम्यान हॉटेल पवन जवळ, एमआयडीसी, खामगाव येथे आरोपीने अल्पवयीन पिडीतेचा पाठलाग करुन तीच्यासोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला व अशाप्रकारे भा.दं.वि. चे कलम ३५४-ड प्रमाणे गुन्हा | **नाही** |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | केला ? | |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने अल्पवयीन पिडीतेला त्याचा मोबाईल नंबर लिहलेली चिठ्ठी व अंगठी देवुन तीची लैंगीक सतावणुक केली व अशा प्रकारे बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत :-**

**१२.** सर्व मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने आणि एकाच घटनेमधून उत्पन्न झाले असल्याने उपरोक्त सर्व मुद्यांचे निष्कर्ष काढण्यासाठी उपलब्ध पुरावा एकाच ठिकाणी विचारात घेणे सोयीस्कर आहे.

**१३.** अभिलेख पडताळले. अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.ए.आळशी व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए.एस.भोजने यांचा युक्तीवाद ऐकला.

**१४.** सा.क्र. ४ रणजित देशमुख (नि.क्र. २१) हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. त्यांनी पुराव्यात घटनास्थळ पंचनामा (नि.क्र. २२) सिध्द केला आहे. मात्र त्यांच्या सरतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी असे सांगितले आहे की, पोलीसांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन चिठ्ठी व तांब्याची अंगठी जप्ती पंचनामा (नि.क्र. २३) प्रमाणे जप्त केली. तसेच आरोपीचा मोबाईल पंचनामा (नि.क्र. २४) प्रमाणे जप्त केला. तोंडी रिपोर्टचे अवलोकन केले असता फिर्यादी/पिडीतेने आरोपीने दिलेली कथीत चिठ्ठी व अंगठी आरोपीला परत दिली असे सांगितलेले नाही. सदर चिठ्ठी व अंगठीचे काय झाले, हे देखील तोंडी रिपोर्टचे अवलोकन केले असता कळुन येत नाही. तपास अधिकारी सा.क्र. ६ पोलीस निरीक्षक सचिन यादव यांनी उलटतपासात मान्य केले आहे की, तथाकथीत चिठ्ठी व त्यामधील मोबाईल नंबर लिहलेले हस्तांक्षर आरोपीचेच आहे काय, याची पडताळणी करण्यासाठी चिठ्ठी हस्तांक्षर तज्ञाकडे पाठवलेली नाही. दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता आरोपीचा मोबाईल तपासादरम्यान जप्त करण्यात आला होता. परंतु आरोपीच्या मोबाईलचे सीडीआर–एसडीआर तपास अधिकारी यांनी प्राप्त केल्याचे दिसुन येत नाही.

**१५.** पिडीता/फिर्यादी (नि.क्र. १३) हीचे कथन असे आहे की, घटना

घडल्यानंतर तीने एका आजोबांच्या मोबाईलवरुन तीचे वडील सा.क्र. २ (नि.क्र. १७) यांच्या मोबाईलवर फोन केला होता. याबाबत तपास अधिकारी यांनी उलटतपासात मान्य केले आहे की, तपासादरम्यान त्यांनी पिडीतेने तीच्या वडीलांना फोन केल्याबाबत तीच्या वडीलांच्या मोबाईलचे सीडीआर–एसडीआर कॉल्स डिलेल्स प्राप्त केले नाहीत अथवा मोबाईलमधील संभाषण तज्ञाकडे पाठवलेले नाही. सबब, प्रस्तुतची त्रुटी ही या प्रकरणातील महत्वपुर्ण त्रुटी ठरते.

**१६.** फिर्यादी/पिडीता हीने पुराव्यात आरोपीने त्याचा मोबाईल क्रमांक असलेली चिठ्ठी व धातुची अंगठी देवुन त्याचे नाव व नंबर सांगुन कॉल कर, अंगठी हातात घालुन दाखव, अशी घटना घडल्याचे सांगितले आहे. त्यामुळे ती घाबरल्याचे तीने सांगितले आहे. फिर्यादीने पुराव्यात तीने नकार देवुन सुध्दा आरोपीने कॉल करण्याचा आग्रह केला, असे सांगितलेले नाही. पुढे काय घडले, आरोपी काय बोलला, तो तेथेच थांबला व त्याने धमकी दिली का तो घटनास्थळावरुन निघुन गेला, याबाबत तोंडी रिपोर्ट अथवा फिर्यादीच्या पुराव्यामध्ये कोणताही तपशील आलेला नाही.

**१७.** पिडीतेचे वडील सा.क्र. २ (नि.क्र. १७) यांनी पुराव्यात अनोळखी नंबरवरुन पिडीतेचा फोन आल्याचे सांगितले आहे. त्यामुळे ते व त्यांचे साळु

घटनास्थळी गेल्याचे व पिडीतेने दोघांना घटना सांगितल्याचे सांगितले आहे. घटनास्थळी आरोपी हजर नव्हता व त्याचा शोध घेतला असता तो मिळुन आला व त्याला समज दिली व नंतर रिपोर्ट दिला, असे या साक्षीदाराने पुराव्यात सांगितलेले आहे. उलटतपासात पिडीतेच्या वडीलांनी मान्य केले आहे की, *'घटनास्थळावर आरोपी मिळुन आला नाही व शोध घेतल्यानंतर मिळुन आल्यानंतर समज दिली होती'*, हा मजकुर त्यांनी जबाब देतेवेळेस पोलीसांना सांगितलेला नाही. सबब, हा साक्षीदार त्याच्या पुराव्यात महत्वपुर्ण सुधारणा करत असल्याचे दिसुन येते.

**१८.** सा.क्र. ३ (नि.क्र. १९) ही पिडीतेची आई आहे. ती घटनेची प्रतयक्षदर्शी साक्षीदार नाही. तोंडी रिपोर्ट (नि.क्र. १४) व फिर्यादी/पिडीता तसेच तीचे वडील यांच्या पुराव्यात आईबाबत अथवा तीला घटना सांगितल्याबाबत कोणताही उल्लेख नाही. सबब, या साक्षीदाराचा पुरावा ऐकीव स्वरुपाचा ठरतो.

**१९.** प्रस्तुतच्या खटल्यातील महत्वपुर्ण साक्षीदार हा पिडीतेचा मावसा सा.क्र. ५ (नि.क्र. २७) हा ठरतो. याअगोदरच नमुद केल्याप्रमाणे पिडीतेच्या वडीलांनी पुराव्यात साळु देखील सोबत होता, असे सांगितले आहे. सा.क्र. ५ याने पिडीता ही साळु भावाची मुलगी असल्याचे सांगितले आहे. मात्र तो जवळचा

नातेवाईक असुन देखील व पिडीतेच्या वडीलांच्या पुराव्यानुसार तो घटनास्थळी लगेच गेलेला असुन देखील व पिडीतेने त्याला घटनेची माहिती सांगितल्याचे व आरोपीला समज दिल्यावेळेस हजर असुन देखील त्याने पुराव्यात घटनेबाबत माहिती नसल्याचे सांगितले आहे. उलटतपासात देखील त्याने आरोपीविरुध्द दोषसिध्द होईल असा आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, हा महत्वपुर्ण पिडीतेचा नातेवाईक असलेला साक्षीदार अभियोग पक्षाच्या केसला पाठिंबा देत नसल्याने अभियोग पक्षाच्या केसला मारक ठरतो. सदर साक्षीदाराला फितुर होण्याचे कोणतेही कारण नाही. उलट तो पिडीतेचा नातेवाईक आहे. आरोपी हा अभियोग पक्षाच्या केसनुसार एका हॉटेलमध्ये कामगार असल्याने साहजिकच त्याचा या साक्षीदाराशी काही संबंध नाही. सबब, सा.क्र. ५ याच्या पुराव्यामुळे एकंदर अभियोग पक्षाच्या केसबाबत साशंकता निर्माण होते.

२०. प्रस्तुतच्या प्रकरणात फिर्यादीने प्रथम एक काळया सावळया रंगाचा माणुस याने वरील घटना केल्याचे सांगितले आहे. फिर्यादीच्या वडीलांनी त्यांच्या साळु सोबत त्या काळया सावळया माणसाचा शोध घेतल्यानंतर तो आरोपी असल्याचे व त्याला समज दिल्याचे सांगितले आहे. याअगोदरच नमुद केल्याप्रमाणे फिर्यादीच्या वडीलांचा साळु सा.क्र. ५ याने फिर्यादी अथवा

फिर्यादीच्या वडीलांच्या पुराव्यास दुजोरा दिलेला नाही. अशा परिस्थितीत फिर्यादी, फिर्यादीचे वडील हे आरोपीला घटनेच्या अगोदरपासुन ओळखत नसल्याने त्याची ओळख निश्चित कशी झाली, याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तपास अधिकारी यांनी आरोपीची ओळख परेड केल्याचे देखील दिसुन येत नाही. ही देखील प्रस्तुतच्या केसमध्ये महत्वाची त्रुटी ठरते.

**२१.** या अगोदर चर्चिले प्रमाणे साक्षीदार क्र. ४ पंच रणजित देशमुख (नि.क्र. २१) यांनी पुराव्यात पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन त्यांच्या समक्ष जप्ती पंचनामा (नि.क्र. २३) प्रमाणे चिठ्ठी व तांब्याची अंगठी जप्त केल्याचे सांगितले आहे. मात्र तपास अधिकारी सा.क्र. ६ पोलीस निरीक्षक सचिन यादव (नि.क्र. ३७) यांनी सरतपासामध्ये पीएसआय बोरसे यांनी तपासकामात पिडीतेकडुन धातुसारखी बदाम छाप असलेली अंगठी व चिठ्ठी जप्ती पंचनामा (नि.क्र. २३) प्रमाणे जप्त केल्याचे सांगितले आहे. ही प्रस्तुतच्या प्रकरणातील महत्वाची तफावत ठरते. या अगोदरच नमुद केल्याप्रमाणे तोंडी रिपोर्ट अथवा फिर्यादी व तीचे वडील यांनी पुराव्यामध्ये आरोपीने दिलेल्या कथीत चिठ्ठी व अंगठीचे पुढे काय झाले याबाबत काहीच सांगितलेले नाही. त्यामुळे पंच साक्षीदार व तपास अधिकारी

यांच्या पुराव्यातील तफावतीमुळे चिठ्ठी व अंगठी नक्की कोणाकडुन जप्त करण्यात आली, याबाबत साशंकता निर्माण होते व त्यामुळेच चिठ्ठी मधील हस्ताक्षर पडताळणी करीता हस्ताक्षर तज्ञाकडे न पाठवणे, आरोपीची ओळख परेड न करणे, फिर्यादीच्या वडीलांच्या मोबाईलची तपासणी न करणे तसेच ज्या अनोळखी क्रमांकावरुन पिडीतेने सर्वप्रथम फोन केला, तो फोन क्रमांक सहज उपलब्ध असुन देखील सदर साक्षीदाराचा पुरावा न नोंदवणे, या सर्व बाबी अभियोग पक्षाच्या केसबाबत साशंकता निर्माण करतात तसेच आरोपीशी कोणत्याही प्रकारे संबंध नसलेला व पिडीतेचा जवळचा नातेवाईक असलेला फिर्यादीच्या वडीलांचा साळु सा.क्र. ५ याने अभियोग पक्षाच्या केसला पाठिंबा न देणे, या सर्व बाबी दर्शवतात की, अभियोग पक्ष घटनेबाबतची मुलभुत माहिती (foundational facts) सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. त्यामुळे पोक्सो कायद्याअंतर्गातील कलम २९ प्रमाणेचे गृहीतक वापरण्या इतपत मुलभुत माहिती (foundational facts) व विश्वास पात्र पुरावा अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर आणण्यात आलेला नाही. सबब, न्यायालयात हजर असलेलया आरोपीनेच पिडीतेचा लैंगिक छळ केला अथवा तीचा विनयभंग केला असा निष्कर्ष प्रस्तुतच्या प्रकरणातील घटनांच्या आधारे संशयापलीकडे जावुन निघत नाही.

२२. सबब, वरील चर्चा व विवेचनाच्या अनुषंगाने तोंडी रिपोर्ट, अभियोग पक्षाच्या सर्व साक्षीदारांचा पुरावा यामध्ये आरोपीने वाईट उद्देशाने अथवा लैंगिक छळ करण्याच्या उद्देशाने पिडीतेला त्याचा मोबाईल नंबर असल्याची चिठ्ठी व अंगठी दिली व ती अंगठी बोटात दिसली पाहिजे व फोन कर असे सांगितल्याचे संशयापलीकडे जावुन सिध्द झालेले नाही. अशा परिस्थितीत आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४–ड व बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १२ नुसार दोषारोप सिध्द होण्यासाठी संशयापलीकडे जावून सिध्द होणारा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. **म्हणून मी मुद्दे क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्र. ३ चे उत्तराकरिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.**

## आदेश

१) आरोपी सुशिल सुरेश सुरवाडे यांची प्रस्तुत खटल्यातून भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५४–ड व बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १२ अन्वये शिक्षा असलेल्या आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीतेचे कलम २३५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे स्वबंधपत्र आणि जामीन बंधपत्र या न्यायालयाच्या सदरच्या न्यायनिर्णयाविरुध्द अपील दाखल झाल्यास जेव्हा केव्हा माननीय उच्च न्यायालय नोटीस देईल, तेव्हा न्यायालयासमोर उपस्थित राहण्याकरीता फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ४३७–अ प्रमाणे सहा महिन्याकरिता कायम करण्यात येतात.

३) दोषारोपपत्रामधील कॉलम १० मधील अनुक्रमांक १ व २ मध्ये नमूद जप्त मुद्देमाल एक तांब्याच्या धातु सारखी दिसणारी अंगठी व एक चिठ्ठी मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावेत.

४) दोषारोपपत्रामधील कॉलम १० मधील अनुक्रमांक ३ मध्ये नमूद जप्त मुद्देमाल झेन कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल आरोपीस अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे परत करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत करण्यात आला.)

AMIT PRALHAD KOKARE
Digitally signed by AMIT PRALHAD KOKARE
Date: 2026.07.30 17:42:30 +0530

**ठिकाण – खामगांव.** **(अमित प्र. कोकरे)**
**दिनांक – ३०/०७/२०२६.** **विशेष न्यायाधीश, खामगांव.**

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | विशेष न्यायालय, खामगांव. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अमित अं. थोलबरे, लघुलेखक श्रेणी- २ |
| न्यायनिर्णय पारीत केल्याचा दिनांक | :- | ३०/०७/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | :- | ३०/०७/२०२६. |